बुधवार,
दि. २ जानेवारी, २०१३

# प्रतिवाद



## स्वयंप्रकाशित वाडी

पाटण तालुक्यातील मान्याचीवाडी येथे घडलेला एक किस्सा. वाडीपासून अर्धा किलोमीटरवर मंगल गोठणे यांची झोपडी आहे. त्यांच्या घरी वीज नव्हती आणि आर्थिक स्थिती लक्षात घेता, ते शक्यही नव्हते. मात्र, सौरऊर्जेने त्यांच्या झोपडीतील अंधार दूर करत रॉकेलचा दिवा कायमचा नष्ट झाला. वीज आल्याचे पाहून त्यांच्या डोळ्यातून आनंदाश्रू आले आणि 'बारा वरस अशीच गेली... पोराबाळांनी कधी उजेड पाहिला नाही. रोज रॉकेलची चिमणी पाहून पोरंही वैतागायची. कधी-कधी रॉकेलही पुरायचे नाही. मात्र, माझ्या अंधाऱ्या झोपडीत सौरऊर्जेने उजेड पाडला' अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली.

मान्याचीवाडी... एकीचे बळ काय असते हे दाखवून देणारी 'तंटामुक्त' वाडी. नुकताच मान्याचीवाडीला संत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियानातील दुसऱ्या क्रमांकाचा राज्यस्तरीय पुरस्कार मिळाला. 'सीएसई मीडिया फेलोशिप' अंतर्गत लेखन आणि संशोधन करण्याच्या निमित्ताने काही दिवसांपूर्वी मान्याचीवाडीला भेट देण्याचा एकदा योग आला. प्रवेशद्वारावरच कमानीशेजारी डाव्या बाजूला लोकवर्गणीतून बांधलेले वडजाई मंदिर. गुलाबी रंगाने रंगलेली मान्याचीवाडी दिवंगत तात्यासाहेब माने यांच्या विचाराने चालणारी. लोकसहभागातून या गावाने भारनियमनावर मात तर केलीच; त्याचबरोबर गेल्या दीड वर्षात ४४८ लोकसंख्या असणाऱ्या वाडीतील शंभर कुटुंबानी सरासरी प्रत्येक महिन्याला १४ हजार याप्रमाणे तीन लाख रुपयांची वीजबचत केली. संपूर्ण वाडीचे महिन्याचे वीजबिल सरासरी ३० हजार यायचे. आता मात्र ते १६ हजारांवर आले. हे साध्य झाले एका अपारंपरिक ऊर्जेने. ही किमया शोधण्यासाठी दहा वर्षे पाठीमागे जावे लागते. एखाद्या मोठ्या गावाला ही बाब किरकोळ वाटत असेल; मात्र मुंबई आणि मजुरीच्या जिवावर आपले आयुष्य कंठणाऱ्या येथील प्रत्येक ग्रामस्थांने गावात अपारंपरिक ऊर्जेसाठी जीवतोड मेहनत केली. यात महिला बचतगटाचा मोलाचा वाटा. महिलांनीच पुढाकार घेतला आणि त्यांनी हे साध्य करून दाखवले.

महिलांमुळेच गावातील प्रत्येक घरी सौरऊर्जा आली. १६ पथदिवे आणि ५ सौरबंब आहेत. परिणामी आता गावात भारनियमन असले काय अन् वीज गेली काय... याचा फारसा फरक मान्याचीवाडीकरांना पडत नाही. कारण आम्ही सौरऊर्जेचे पाईक असल्याचे ते अभिमानाने सांगतात. मान्याचीवाडीची खरी ओळख निर्माण झाली ती तत्कालीन सरपंच दिवंगत तात्यासाहेब माने यांच्यामुळे. शिक्षकी पेशातील या माणसाने मान्याचीवाडीचे रुपडे पालटले आणि वाडीची ओळख देशपातळीवर अधोरेखित केली. त्यांच्या अपघाती निधनानंतर पाटण तालुका हळहळला. 'स्वयंप्रकाशित मान्याचीवाडी'त गेले की त्यांची आठवण नेहमीच येते. त्यांचे कार्य पुढे नेण्याकामी येथील प्रत्येक घटक दृश्य-अदृश्य स्वरूपात झटत आहे.

**- मोहन मस्कर-पाटील**